दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४६ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

सोमवार दि. १ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, प्रतिपदा संध्याकाळी ४-३८ पर्यंत नंतर द्वितीया, दिवस नक्षत्र– ज्येष्ठा संध्याकाळी ७-०९ पर्यंत नंतर मूळ, चंद्र रास - वृश्चिक संध्याकाळी ७-०९ पर्यंत नंतर धनु, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन रात्री १-५०

### पुण्यातील आयटी कंपनी बंद

**पुणे** : पुण्यातील हिंजवडी आयटी हबमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. हिंजवडी फेज-२ येथील थिंक टेक्नॉलॉजी इंडिया या कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यालय बंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ७०० हून अधिक सॉफ्टवेअर इंजिनिअर्स आणि फ्रेशर्स अचानक बेरोजगार झाले आहेत. कंपनी गेल्या काही महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे पगार थकवत असल्याची माहिती समोर आली असून काही धनादेशही बाऊन्स झाले आहेत.

## सारांश वृत्त

### मेफेड्रोन पावडरसह तिघांना अटक

**ठाणे** : अवैध बाजारात ७० लाख रुपये किमतीची ५०० ग्रॅम मेफेड्रोन क्रिस्टल पावडर, एक देशी पिस्तूल आणि नऊ जिवंत काडतुसांसह तिघांना अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट-१ ला २७ मे रोजी मुंब्रा येथील जुन्या खारेगाव टोल नाक्याजवळ एमडी ड्रग्जच्या व्यवहाराची माहिती मिळाली. पोलिसांनी रेहमान अब्दुल खान, सिद्धांत संजय तांबोळी आणि साहिल नसीम खान यांच्याकडून एमडी क्रिस्टल पावडर जप्त केली.

### रिझर्व्ह बँक दर स्थिर ठेवण्याची शक्यता

**मुंबई** : रिझर्व्ह बँक या आठवड्यात प्रमुख धोरण दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याची अपेक्षा आहे आणि पश्चिम आशियातील अशांततेच्या पार्श्वभूमीवर महागाई आणि वाढीच्या मार्गावर संभाव्य प्रतिकूल परिस्थितीला कारणीभूत ठरेल अशी सावध भूमिका घेईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. ऊर्जेच्या वाढत्या किमती, पुरवठा साखळीतील सतत समस्या आणि प्रामुख्याने बाह्य आव्हानांमुळे रुपयाचे अवमूल्यन होत असल्याने, रिझर्व्ह बँक ३ ते ५ जून दरम्यान होणाऱ्या द्वैमासिक पतधोरण बैठकीत महागाईचा अंदाज वाढवू शकते, असे मत आहे.

### जवानाला मारहाण; चौघांना अटक

**झाशी** : झाशी पोलिसांनी पीआरडी जवानाला मारहाण करून लूट केल्याप्रकरणी रविवारी चौघांना अटक केली. नवाबाद पोलिस ठाण्याचे एसएचओ रवी श्रीवास्तव यांनी सांगितले की, शुक्रवारी संध्याकाळी पीआरडी जवान दयाशंकर वर्मा ड्युटीवरून परत येत असताना प्रशांत वर्मा उर्फ गोलू वर्मा, त्याचा भाऊ ऋषभ आणि इतरांनी त्यांना अडवले. एक पीआरडी जवान पोलिसांना गर्दी नियंत्रणात मदत करतो.

### कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची मोठी घोषणा

# 10 दिवसांत शेतकरी कर्जमाफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अहिल्यानगर** : राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणारी मोठी घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली कर्जमाफी येत्या ८ ते १० दिवसांत पूर्ण केली जाईल, असे स्पष्ट केले.

कार्यक्रमात बोलताना भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली आहे. "येत्या आठ ते दहा दिवसांत ही कर्जमाफी प्रत्यक्षात पूर्ण केली जाईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा पवार यांच्या परवानगीने मी ही माहिती देत आहे," असे त्यांनी सांगितले.

शेतकरी कर्जमाफीबाबत यापूर्वीही राज्य सरकारकडून हालचाली सुरू असल्याचे संकेत देण्यात आले होते. मार्च महिन्यात विधान परिषदेत बोलताना दत्तात्रय भरणे यांनी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती दिली होती. या समितीच्या अहवालानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले होते.

अहिल्यानगरमधील कार्यक्रमात भरणे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. चौंडी परिसराच्या विकासासाठी सुमारे १२०० ते १३०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. पुढील दोन ते तीन वर्षांत या भागाचे चित्र पूर्णपणे बदललेले दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याच वेळी धनगर समाजातील तरुण आणि मेंढपाळांसाठी कृषी विभागामार्फत स्वतंत्र योजना आणण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू असल्याचेही भरणे यांनी जाहीर केले. मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार या योजनेवर काम सुरू असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील युवकांना होईल, असे त्यांनी नमूद केले.

#### कर्जमाफी योजनेतील प्रमुख तरतुदी

- ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत (एनपीए) असलेल्या अल्पमुदत पीक कर्जधारक पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार.
- वेळेवर कर्जफेड करणाऱ्या आणि कोणतीही थकबाकी नसलेल्या नियमित शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार.

## राहुल गांधी यांचा केंद्रावर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) बारावीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत गुणांकन प्रक्रियेतील कथित त्रुटींवरून केंद्र सरकारवर टीका केली आहे. रविवारी त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर विद्यार्थ्यांसोबतच्या चर्चेचा व्हिडीओ शेअर करत विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली.

राहुल गांधी यांनी संवाद साधलेल्या विद्यार्थ्यांमध्ये वेदांत या विद्यार्थ्याचाही समावेश होता. पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या उत्तरपत्रिकेच्या स्कॅन प्रती आपल्या नसल्याचा आरोप वेदांतने केला आहे. त्याची सोशल मीडियावरील पोस्ट व्हायरल झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनीही अशाच प्रकारच्या तक्रारी पुढे आणल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणावर भाष्य करत राहुल गांधी म्हणाले की, वेदांत आणि त्याच्या मित्रांनी सीबीएसई तसेच केंद्र सरकारकडे काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांना लक्ष्य करण्यात आले. विद्यार्थ्यांना देशद्रोही किंवा दहशतवादी ठरवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीतील कथित गोंधळ आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा यानिमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला असून, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी पदभार स्वीकारला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय नौदलाच्या २७ व्या प्रमुखपदी ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी रविवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी भारतीय नौदल अधिक सक्षम, मजबूत, वेगवान आणि प्रभावी बनविण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करण्याचा निर्धार व्यक्त केला. राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण आणि देशाच्या विकासासाठी नौदलाची भूमिका अधिक बळकट करणे हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पदभार स्वीकारण्यापूर्वी ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानांना अभिवादन केले. त्यानंतर साऊथ ब्लॉक परिसरात त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

यावेळी त्यांनी सांगितले की, भारतीय नौदल संयुक्तता, आत्मनिर्भरता आणि स्वदेशीकरणाच्या ध्येयासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. नौदलातील अधिकारी आणि जवानांचे कल्याण, व्यावसायिक प्रगती आणि वैयक्तिक विकास यांनाही सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल.

निवृत्त होत असलेले नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांचेही त्यांनी विशेष कौतुक केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय नौदलाने अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले असून त्यांची दूरदृष्टी आणि मार्गदर्शन नौदलासाठी प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी यावेळी बोलताना नमूद केले.

### १ जूनपासून राज्यात वादळी पावसाचा इशारा

# शेतकरी बांधवांनो पेरणीची घाई नको

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : मे महिन्यातील तीव्र उष्णतेनंतर राज्यातील हवामानात मोठा बदल होण्यास सुरुवात झाली असून १ जूनपासून अनेक भागांत मान्सूनपूर्व वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र हा पाऊस मान्सूनचा नसून केवळ पूर्वमान्सून स्वरूपाचा असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, खानदेश आणि काही प्रमाणात कोकण किनारपट्टी भागात दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार होऊन मेघगर्जनेसह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि जोरदार वारेही वाहू शकतात.

राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जूनपर्यंत अधिकृत मान्सून दाखल होण्याची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. सध्या नैऋत्य मान्सून अद्याप केरळमध्येच असून महाराष्ट्रात पोहोचण्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहेत. आगामी आठवड्यात राज्यातील कमाल तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता असून नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळू शकतो. मात्र पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वरच राहण्याचा अंदाज आहे.

हवामानातील बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकरी व नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. मान्सूनपूर्व पावसावर विसंबून पेरणी करू नये, कारण त्यानंतर पावसाचा खंड पडल्यास बियाण्यांचे नुकसान होऊ शकते. मान्सूनचे अधिकृत आगमन आणि पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्ला देण्यात आला आहे. तसेच मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटावेळी घराबाहेर पडणे टाळावे, झाडाखाली, टिनशेडखाली किंवा वीजवाहिन्यांजवळ उभे राहू नये. शेतकऱ्यांनी जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत आणि हवामान खात्याच्या अधिकृत सूचनांवर लक्ष ठेवावे, असे प्रशासनाने म्हटले आहे.

### ८० लाख महिला अपात्र ठरल्यानंतर रोहिणी खडसे यांचा हल्लाबोल

# लाडक्या बहिणी दोडक्या झाल्या का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जळगाव** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून सुमारे ८० लाख महिला अपात्र ठरल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत सुरुवातीला २ कोटी ४६ लाखांहून अधिक महिलांनी नोंदणी केली होती. मात्र ई-केवायसी, उत्पन्न मर्यादा आणि इतर पात्रता निकषांच्या अंमलबजावणीनंतर पात्र लाभार्थ्यांची संख्या सुमारे १ कोटी ६६ लाखांवर आली आहे.

राज्य सरकारने लाभार्थी महिलांसाठी ठरवलेल्या अटी व पात्रता निकषांची पूर्तता करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत दिली होती. या निकषांमध्ये न बसणाऱ्या किंवा आवश्यक प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या महिलांना योजनेतून वगळण्यात आले. त्यामुळे जवळपास ८० लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आल्यानंतर विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

रोहिणी खडसे यांनी सरकारला सवाल करत, "निवडणुकीपूर्वी महिलांना मोठ्या प्रमाणात लाभ देण्यात आला, पण निवडणुका संपताच लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे का?" असा प्रश्न उपस्थित केला. "सरकारला आता लाडक्या बहिणींचा भार वाटू लागला आहे का? निवडणूक संपल्यानंतर बहिणींची गरज संपली का?" असा टोला त्यांनी लगावला. वाढत्या महागाईच्या काळात महिलांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्यावर अन्याय केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या निर्णयावरून विरोधी पक्षांकडून सरकारवर टीकेची झोड उठली आहे. सुप्रिया सुळे यांनीही सरकारवर महिलांचा विश्वासघात केल्याचा आरोप केला आहे. याउलट सरकारकडून योजना बंद होणार नसल्याचा दावा करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना नेते संजय निरुपम यांनी योजना सुरूच राहणार असून विरोधकांकडून संभ्रम निर्माण केला जात असल्याचे म्हटले आहे.

लाडकी बहीण योजनेतील अपात्रता, रखडलेले हप्ते आणि ई-केवायसी प्रक्रियेतील अडचणी यामुळे हा मुद्दा राज्यातील राजकारणाच्या केंद्रस्थानी आला असून आगामी काळात यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### शेअर बाजारासाठी महत्त्वाचा आठवडा

**मुंबई:** भारतीय शेअर बाजारासाठी येणारा आठवडा अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून गुंतवणूकदारांचे लक्ष अमेरिकी-इराण परिस्थिती, कच्च्या तेलाच्या किमती, परकीय गुंतवणूकदारांची भूमिका आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) पतधोरण निर्णयाकडे लागले आहे. तज्ज्ञांच्या मते, या सर्व घटकांचा थेट परिणाम सेन्सेक्स आणि निफ्टीच्या दिशेवर होऊ शकतो. आरबीआयची पतधोरण समिती ३ ते ५ जूनदरम्यान बैठक घेणार असून ५ जून रोजी रेपो दराबाबतचा निर्णय जाहीर केला जाणार आहे. चलनवाढ, रुपयाची स्थिती आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेता बाजाराचे लक्ष या निर्णयाकडे असेल.

## अटक आरोपींचे टीएमसीशीच संबंध?

### अभिषेक बॅनर्जी हल्ला प्रकरणाला नवे वळण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाला आता नवे राजकीय वळण मिळाले आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या काही आरोपींचे संबंध तृणमूल काँग्रेसच्या माजी नेत्यांशी असल्याची माहिती तपासातून समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

सोनारपूर येथे निवडणूक हिंसाचारातील जखमी कार्यकर्त्यांची भेट घेण्यासाठी गेलेल्या अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही लोकांनी घोषणाबाजी, धक्काबुक्की तसेच अंडीफेक केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले होते. तपासादरम्यान अटक आरोपींपैकी काही जण पूर्वी तृणमूल काँग्रेसशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. एका आरोपीच्या कुटुंबीयांनी तो टीएमसीचा कार्यकर्ता असल्याचा दावा केल्याचे वृत्त आहे. तसेच काही आरोपींचे पक्षाच्या एका माजी आमदाराशी संबंध असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हा हल्ला केवळ विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घडवून आणला की त्यामागे अंतर्गत राजकीय संघर्ष आहे, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.


दरम्यान, अभिषेक बॅनर्जी यांनी या हल्ल्यामागे भाजप समर्थकांचा हात असल्याचा आरोप केला आहे. भाजपने हे आरोप फेटाळून लावत हा जनतेच्या संतापाचा उद्रेक असल्याचे म्हटले आहे. या घटनेनंतर बंगालमधील राजकीय वातावरण तापले असून, हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था आणि निवडणुकीनंतरच्या हिंसाचाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. अभिषेक बॅनर्जी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तपाय यंत्रणा सखोल तपास करत आहेत.

(संबंधित वृत्त पान ४ वर)

### विषारी दारूकांड प्रकरणी मोठी कारवाई

# आठ पोलीस अधिकारी-कर्मचारी निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारू प्रकरणामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची दखल घेत दोन्ही शहरांच्या पोलीस आयुक्तांनी कठोर कारवाई केली आहे. अवैध व विषारी दारू विक्री रोखण्यात झालेला निष्काळजीपणा, पर्यवेक्षणातील त्रुटी आणि कर्तव्यातील हलगर्जीपणाचा ठपका ठेवत एकूण आठ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे पोलीस दलात खळबळ उडाली असून अवैध धंद्यांविरोधात प्रशासनाने शून्य सहनशीलतेची भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुण्यातील हडपसर परिसरात विषारी दारूमुळे अनेकांचा मृत्यू झाल्यानंतर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी प्रकरणाची सखोल चौकशी केली. त्यानंतर हडपसर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळून आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, सहाय्यक पोलीस निरीक्षक हसिना शिकलगार आणि पोलीस उपनिरीक्षक हसन मुलाणी यांना निलंबित करण्यात आले.

पिंपरी-चिंचवडमधील दापोडी परिसरातही विषारी दारू विक्रीचे जाळे सक्रिय असल्याचे उघड झाल्यानंतर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कडक भूमिका घेतली. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, फौजदार तथा तपास पथक प्रमुख राजू भास्कर यांच्यासह पोलीस कर्मचारी जयदीप सोनवणे, नवनाथ पोटे, सागर जाधव आणि विशाल काळे यांना निलंबित करण्यात आले.

विषारी दारू प्रकरणाच्या बातम्या सोशल मीडियासह विविध माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्यानंतर पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. अवैध धंदे सुरू असताना स्थानिक पातळीवर प्रभावी कारवाई झाली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर पोलीस दलावरील जनतेचा विश्वास कायम राखण्यासाठी आणि जबाबदार अधिकाऱ्यांना उत्तरदायी धरण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विषारी दारू प्रकरणानंतर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या भागांत अवैध मद्यविक्रीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. विविध ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात गावठी दारू, रसायने आणि मद्यनिर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायाशी संबंधित घटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ईडी अधिकारी सत्यव्रत कुमार सेवामुक्त


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : शिवसेना खासदार संजय राऊत, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह अनेक चर्चित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणांच्या तपासामुळे चर्चेत आलेले अंमलबजावणी संचालनालयाचे विशेष संचालक सत्यव्रत कुमार यांची प्रतिनियुक्ती मुदतीपूर्वीच संपुष्टात आणण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या नियुक्ती समितीने त्यांची ईडीमधील नियुक्ती कमी करत त्यांना मूळ सेवेकडे म्हणजे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाकडे परत पाठवण्यास मंजुरी दिली आहे.

सत्यव्रत कुमार हे २००४ बॅचचे भारतीय महसूल सेवा अधिकारी असून त्यांनी ईडीमध्ये महत्त्वाच्या पदांवर काम केले होते. महाराष्ट्रातील अनेक गाजलेल्या प्रकरणांच्या तपासात त्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. संजय राऊत, अनिल देशमुख यांच्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्डरिंग प्रकरणांच्या तपासामुळे ते विशेष चर्चेत आले होते. सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांची ईडीच्या पूर्व विभागाचे विशेष संचालक म्हणून कोलकाता येथे बदली करण्यात आली होती. डिसेंबर २०२२ मध्ये त्यांना विशेष संचालक पदावर नियुक्त करण्यात आले होते आणि त्यांचा कार्यकाळ ऑक्टोबर २०२६ पर्यंत होता. मात्र आता सुमारे १७ महिने आधीच त्यांची प्रतिनियुक्ती समाप्त करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने ३० मे रोजी जारी केलेल्या आदेशानुसार सत्यव्रत कुमार यांना त्यांच्या मूळ संवर्गात परत पाठवण्यात आले आहे.

## संपादकीय

# इंधन दरवाढीचे अर्थकारण



**भारतातील इंधन दरवाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतीत नसून, केंद्र व राज्य सरकारांनी लादलेल्या भरमसाट करांमध्ये दडलेले आहे. सामान्य माणसाच्या खिशावर थेट डल्ला मारणारी ही कररचना अत्यंत अन्यायकारक असून, अर्थव्यवस्थेच्या मुळावर उठणाऱ्या या धोरणात्मक लुटीचे गांभीर्याने विश्लेषण करणे आता काळाची गरज बनले आहे.**

जेव्हा जेव्हा पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढतात, तेव्हा सरकारकडून अत्यंत सोयीस्करपणे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींकडे बोट दाखवले जाते. आपला देश गरजेच्या पंच्याऐंशी टक्के कच्चे तेल परदेशातून आयात करतो, हे सत्य असले, तरी दरवाढीचे संपूर्ण खापर जागतिक परिस्थितीवर फोडणे हा राजकीय ढोंगीपणा आहे. इंधनाच्या अंतिम किमतीची प्रत्यक्ष रचना, म्हणजेच त्याची 'ॲनाटॉमी' बारकाईने समजून घेतल्यास एक अतिशय धक्कादायक वास्तव आपल्यासमोर उभे राहते. पेट्रोल पंपावर आपण जे पैसे मोजतो, त्यातील निम्मी रक्कम ही इंधनाची मूळ किंमत नसून, ती विविध करांच्या रूपाने थेट सरकारी तिजोरीत जमा होणारी अधिकृत वसुली असते, हे वास्तव जनतेपासून सहसा लपवले जाते. इंधनाची अंतिम किंमत नेमकी कशी ठरते, याची संपूर्ण प्रक्रिया समजून घेणे अत्यंत उद्बोधक आहे. देशातील तेल विपणन कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातून कच्चे तेल आयात करतात. रिफायनरीमध्ये या कच्च्या तेलावर प्रक्रिया करून पेट्रोल आणि डिझेल तयार केले जाते. या शुद्धीकरणाचा खर्च, कंपन्यांचा स्वतःचा नफा, आणि इंधन पंपापर्यंत पोहोचवण्याचा वाहतूक खर्च मिळून इंधनाची 'मूळ किंमत' निश्चित होते. ही मूळ किंमत आपण प्रत्यक्ष मोजत असलेल्या रकमेच्या निम्म्याहूनही कमी असते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर कितीही घसरले, तरी या मूळ किमतीतील कपात ग्राहकांपर्यंत कधीच पोहोचू न देण्याची अत्यंत चोख व्यवस्था आपल्या धोरणकर्त्यांनी जाणीवपूर्वक करून ठेवली आहे. जागतिक बाजारातील घसरत्या किमतींचा फायदा थेट तेल कंपन्यांच्या ताळेबंदात नफा म्हणून जमा होतो. इंधनाची मूळ किंमत निश्चित झाल्यानंतर त्यावर सर्वात मोठा घाव घातला जातो तो केंद्र सरकारच्या उत्पादन शुल्काचा. हे उत्पादन शुल्क प्रति लिटर एका निश्चित रकमेत आकारले जाते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव कोसळतात, तेव्हा सर्वसामान्य ग्राहकांना इंधन स्वस्त होऊन मोठा दिलासा मिळणे अपेक्षित असते. पण नेमक्या याच वेळी केंद्र सरकार आपले उत्पादन शुल्क गुपचूप वाढवून तो सर्व फायदा स्वतःच्या पदरात पाडून घेते. केंद्राने आपली झोळी भरून घेतल्यानंतर, राज्य सरकारेदेखील या अधिकृत लुटीत अजिबात मागे राहत नाहीत. इंधनाच्या मूळ किमतीवर आणि केंद्राच्या उत्पादन शुल्कावर राज्य सरकारे आपला मूल्यवर्धित कर लावतात. राज्यांचा कर हा बहुतांश वेळा टक्केवारीच्या स्वरूपात असतो. याचा भयंकर परिणाम असा होतो की, जेव्हा जेव्हा इंधनाची मूळ किंमत किंवा केंद्राचे उत्पादन शुल्क थोडे जरी वाढते, तेव्हा राज्यांचा कर आपोआप फुगत जातो आणि ग्राहकांवरील बोजा दुप्पट वेगाने वाढतो. करावर कर लादण्याची ही दुहेरी पद्धत अत्यंत शोषणकारी आहे. दरवाढ झाल्यावर केंद्र सरकार राज्यांना 'व्हॅट' कमी करण्याचा शहाजोग सल्ला देते, तर राज्ये केंद्राकडे बोट दाखवून स्वतःची जबाबदारी तत्परतेने झटकून टाकतात. या सर्व भरमसाट करांनंतर त्यात पेट्रोल पंप चालकाचे कमिशन जोडले जाते आणि मग ती अंतिम रक्कम शंभर रुपयांचा टप्पा ओलांडून ग्राहकाच्या माथी मारली जाते. आजच्या काळात इंधन ही काही चैनीची वस्तू राहिलेली नाही; ती आपल्या अर्थव्यवस्थेची मुख्य रक्तवाहिनी आहे. डिझेल महाग झाले की ग्रामीण अर्थव्यवस्थेतील शेतीचा उत्पादन खर्च वाढतो. ट्रॅमालवाहतूक महागली की अन्नधान्य, भाजीपाला आणि औषधांसह सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडतात. याला अर्थशास्त्राच्या परिभाषेत 'महागाईचा साखळी परिणाम' म्हटले जाते. खिशातील पैसा संपल्यामुळे बाजारातील मागणी घटते आणि त्याचा अंतिम फटका देशाच्या औद्योगिक वाढीला आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेला बसतो. या भयंकर करचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग अत्यंत सोपा आणि स्पष्ट आहे. पेट्रोल आणि डिझेलला वस्तू व सेवा कराच्या कक्षेत आणल्यास संपूर्ण देशात इंधनाचे दर मोठ्या प्रमाणावर खाली येऊ शकतात. जास्तीत जास्त अठ्ठावीस टक्के 'जीएसटी' लावला, तरी आजच्या तुलनेत ग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा मिळू शकतो. परंतु, राज्यांचा या प्रस्तावाला प्रखर विरोध आहे आणि केंद्राचीही तशी प्रामाणिक इच्छाशक्ती अजिबात दिसत नाही. स्वतःचे राजकीय आणि आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी सर्वच पक्षांनी या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यावर अत्यंत सोयीस्कर मौन बाळगले आहे. जोपर्यंत इंधनावरील कररचनेत पूर्ण पारदर्शकता येत नाही आणि हे कर तर्कसंगत पातळीवर आणले जात नाहीत, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय दरांचे तकलादू कारण देऊन सामान्य जनतेला असेच निर्दयीपणे लुटले जाईल, हे एक अटळ आणि अत्यंत कटू वास्तव आहे.

# औद्योगिक निर्देशांक: माहितीच्या अचूकतेचे आव्हान

**» औद्योगिक उत्पादनाचा नवा निर्देशांक जाहीर करून सरकारने अर्थव्यवस्थेचे व्यापक चित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पण, जोपर्यंत माहिती संकलनाची पद्धत अचूक होत नाही, तोपर्यंत हा बदल पूर्णपणे निरर्थक ठरणार आहे.**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची प्रकृती कशी आहे, हे मोजण्याचे एक अत्यंत महत्त्वाचे परिमाण म्हणजे औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) होय. हा निर्देशांक देशातील कारखाने, खाणकाम आणि वीज निर्मिती क्षेत्रातील वाढीचा वेग दर्शवतो. काळानुसार अर्थव्यवस्थेचे स्वरूप अत्यंत वेगाने बदलत असते. त्यामुळे हा निर्देशांक मोजण्याची पद्धत, त्याचे आधारभूत वर्ष आणि त्यात समाविष्ट असलेल्या वस्तूंची यादी वेळोवेळी अद्ययावत करणे नितांत गरजेचे असते. जुन्या आकडेवारीनुसार आजच्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करणे, म्हणजे एखादा शतकापूर्वीचा कालबाह्य नकाशा हातात घेऊन नवीन शहरात रस्ता शोधण्यासारखे आहे. सरकारने नुकताच नवा आधारभूत महिना आणि नवीन यादी जाहीर करून अर्थव्यवस्थेतील आधुनिक बदलांना सामावून घेण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. जुन्या यादीतील कालबाह्य वस्तू वगळून त्यात



स्मार्टफोन्स, इलेक्ट्रिक वाहने आणि अपारंपरिक ऊर्जेची साधने यांसारख्या आधुनिक वस्तूंचा अत्यंत सुयोग्य समावेश करण्यात आला आहे. यामुळे नवा औद्योगिक निर्देशांक खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकातील अर्थव्यवस्थेचे अचूक प्रतिनिधित्व करेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

हा बदल कागदावर अत्यंत आश्वासक आणि परिपूर्ण वाटतो. वस्तूंची यादी विस्तारल्यामुळे आणि आधुनिक क्षेत्रांना योग्य भारांश दिल्यामुळे, देशाच्या औद्योगिक प्रगतीचे अधिक स्पष्ट चित्र समोर येईल, असा सरकारचा दावा आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेला आपले पतधोरण आणि व्याजदर ठरवण्यासाठी या निर्देशांकाचा मोठा उपयोग होतो. तसेच, अर्थ मंत्रालयाला गुंतवणुकीचे निर्णय घेण्यासाठी आणि धोरणात्मक बदल करण्यासाठी याच आकडेवारीवर पूर्णपणे अवलंबून राहावे लागते. परदेशी गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय मानांकन संस्थादेखील याच सरकारी आकडेवारीच्या आधारावर भारताच्या प्रगतीचे मूल्यमापन करत असतात. त्यामुळे या निर्देशांकाची व्याप्ती वाढवणे, हे निश्चितच एक सकारात्मक आणि पुढारलेले पाऊल आहे.

निर्देशांकाची व्याप्ती नक्कीच वाढवली असली, तरी ही प्राथमिक माहिती गोळा करण्याची आपली प्रशासकीय पद्धत अजूनही अतिशय जुनाट, सदोष आणि अत्यंत संथ आहे. देशातील हजारो कारखाने आणि उत्पादकांकडून दर महिन्याला उत्पादनाची आकडेवारी मागवली जाते. मात्र, अनेक कंपन्या ही माहिती वेळेवर देत नाहीत किंवा ती अत्यंत ढिसाळपणे भरून पाठवतात. याहूनही मोठी त्रुटी म्हणजे, आपल्या देशातील असंघटित आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे (एमएसएमई) या निर्देशांकातील प्रतिनिधित्व अत्यंत तोकडे आहे. असंघटित क्षेत्रातील उत्पादनाची कोणतीही अचूक नोंद सरकारी दफ्तरी वेळेवर पोहोचत नाही. अनेकदा मोठ्या कंपन्यांची आकडेवारी समोर ठेवून छोट्या उद्योगांच्या वाढीचा अंदाज बांधला जातो, जो वास्तवाला धरून नसतो. माहिती संकलनातील या प्रचंड विलंबामुळे आणि रचनात्मक त्रुटींमुळे जो अंतिम निर्देशांक जाहीर होतो, तो जमिनीवरील वास्तवापेक्षा पूर्णपणे वेगळा असतो. ही सदोष आकडेवारी देशाच्या अर्थव्यवस्थेचे खरे दुखणे लपवून ठेवण्याचे काम करते.

अनेकदा असे दिसते की, उत्पादन निर्देशांकाचे आकडे अचानक खूप वाढलेले किंवा अनपेक्षितरीत्या घसरलेले दाखवले जातात. ही अवास्तव अस्थिरता बाजारात मोठा गोंधळ निर्माण करते. एकीकडे वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) संकलन वेगाने वाढत असते, 'परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स' (पीएमआय) सारखे खासगी निर्देशांक अर्थव्यवस्थेत मोठी तेजी दाखवत असतात, पण अगदी त्याच वेळी सरकारी 'आयआयपी' आकडेवारी मात्र औद्योगिक मंदीचे संकेत देत असते. यावर खरा आणि शाश्वत उपाय काय असू शकतो? सरकारने आता माहिती संकलनाच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल करण्याची नितांत गरज आहे. कारखान्यांकडून उत्पादनाची माहिती जुन्या पोर्टलवर मागवण्याऐवजी, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित आणि डिजिटल केली पाहिजे. निर्देशांकाची व्याप्ती वाढवणे हा रोगावरील अर्धा उपाय आहे.

सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे, ही माहिती अत्यंत अचूक आणि वेगाने संकलित करण्याची सक्षम यंत्रणा उभी करणे होय. जोपर्यंत माहिती संकलनाचा पाया मजबूत होत नाही, तोपर्यंत नवीन निर्देशांकाची ही आकर्षक इमारत डळमळीतच राहील. अचूक आकडेवारी हाच प्रगत अर्थव्यवस्थेचा खरा कणा असतो. या कण्याला बळकटी दिल्याशिवाय महासत्ता बनण्याचे भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही, हे वास्तव आता स्वीकारलेच पाहिजे.

# वडगाव मावळात हातभट्टी दारूचा सुळसुळाट कायम

## अवैध हातभट्टी दारू विक्रीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मावळ :** फुगेवाडी येथे विषारी गावठी दारू प्रकरणात अनेकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात खळबळ उडाली असताना मावळ तालुक्यातील अवैध हातभट्टी दारू विक्रीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वारंवार कारवाया होऊनही तालुक्यातील अनेक भागांत गावठी दारूची विक्री राजरोसपणे सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भविष्यात मावळातही फुगेवाडीसारखी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित



केला जात आहे.

मावळ तालुक्याच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी हातभट्टी दारूचे अड्डे आजही कार्यरत असल्याचे वास्तव आहे. गावठी दारू कमी किमतीत सहज उपलब्ध होत असल्याने मजूर, कामगार आणि दारूच्या व्यसनाधीन व्यक्तींकडून तिची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. मात्र अशा दारूच्या उत्पादनाला कोणतीही कायदेशीर परवानगी नसून ती पूर्णपणे अवैध स्वरूपात तयार व विक्री केली जाते. ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी करण्यात येतात. पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अधूनमधून धाडी टाकून कारवाया केल्या जातात. मात्र काही दिवसांतच हे अड्डे पुन्हा सुरू होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वडगाव शहरातील गावठाण परिसरात भरवस्तीत असलेला एक गावठी दारूचा अड्डा अनेक वर्षांपासून नागरिकांच्या डोकेदुखीचा विषय ठरला आहे. या अड्ड्यावर पोलिसांनी अनेकदा कारवाई केली आहे. तसेच आमदार सुनील शेळके, नगराध्यक्षा अबोली ढोरे, माजी उपनगराध्यक्षा सायली म्हाळसकर आणि माजी नगरसेवक राहुल ढोरे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन हा अड्डा बंद करण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र सर्व प्रयत्नांनंतरही हा अवैध व्यवसाय सुरूच असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या दारू अड्ड्यांमुळे परिसरात अनेकदा वाद, भांडणे तसेच गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जाते. काही जणांचे जीवही या अवैध दारूमुळे गेल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

गावठी दारू तयार करताना सडलेला गूळ, मळी, मोहाची फुले आदी पदार्थांचा वापर केला जातो. अधिक नशा यावी आणि ती जास्त काळ टिकावी यासाठी काही ठिकाणी मिथेनॉल, युरिया, ऑक्सिटोसिन तसेच बॅटरीतील आम्लासारखी घातक रसायने मिसळली जातात. विशेषतः मिथेनॉल हे अत्यंत विषारी रसायन असून त्याचा अल्प प्रमाणातील वापरही जीवघेणा ठरू शकतो.

फुगेवाडीतील विषारी दारू प्रकरणातही मिथेनॉलच्या मिश्रणामुळे अनेकांचे बळी गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मावळ तालुक्यातील अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्रीविरोधात कठोर मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी पोलिस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने प्रभावी कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# मुळा नदी प्रदूषणाच्या विळख्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** नद्यांच्या संवर्धनासाठी आणि प्रदूषणमुक्तीसाठी महापालिकेकडून कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवल्या जात असल्या, तरी मुळा नदीची अवस्था दयनीय असल्याचे वास्तव समोर आले आहे. नदी परिसरात करण्यात आलेल्या पाहणीत प्लास्टिक कचऱ्याचे ढीग, फेसाळलेले पाणी, जलपर्णीचा साठा आणि मानवी हस्तक्षेपाचे चिंताजनक चित्र दिसून आले.

एकीकडे नदी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि जलसंवर्धनाच्या घोषणा दिल्या जात असताना दुसरीकडे मुळा नदी प्रदूषणाच्या गंभीर विळख्यात अडकलेली दिसत आहे. अनेक ठिकाणी नदीकाठाचे नैसर्गिक स्वरूप पूर्णपणे बदलून गेले असून नदीचे अस्तित्वच धोक्यात आल्याची भावना पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. काही भागांमध्ये जलपर्णी काढण्याची मोहीम राबविण्यात आल्याचे दिसून आले. मात्र काढलेली जलपर्णी नदीकाठावरच टाकून दिल्याने स्वच्छता मोहिमेच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे चित्र आहे. नदी स्वच्छतेच्या नावाखाली केवळ दिखाऊ कामे केली जात आहेत का, असा प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे.

नदीच्या काही भागांमध्ये पाण्यावर मोठ्या प्रमाणात पांढऱ्या फेसाचे थर जमा झाल्याचे आढळले. फेसाळलेल्या पाण्यामुळे प्रदूषणाची तीव्रता स्पष्टपणे जाणवत होती. विविध नाल्यांमधून येणारे दूषित सांडपाणी तसेच रासायनिक घटक यामुळे ही परिस्थिती निर्माण होत आहे.

# पालिकेतील ८८ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांमध्ये अनेक वर्षे सेवा बजावलेल्या एकूण ८८ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव करण्यात आला. संत तुकारामनगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजित कार्यक्रमात महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, किरण गायकवाड, प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी-चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजर्डे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाकार्याचा गौरव करताना सांगितले की, महापालिकेच्या विकासात आणि नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यात या कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान राहिले आहे. अनेकांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ सार्वजनिक सेवेसाठी दिला असून त्यांचे अनुभव आणि कार्यपद्धती पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत.

यंदा सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता माणिक चव्हाण, कार्यकारी अभियंता रवींद्र सूर्यवंशी, सहाय्यक आयुक्त राजीव घुले व राजाराम सरगर, मुख्याध्यापक बुधा नाडेकर, रामदास चपटे, बाळासाहेब आल्हाट, मुख्याध्यापिका पुष्पलता महाकाळ, अंजली झगडे, श्रीकांत चौगुले, सविता म्हस्के, सुनंदा शिंदे, भारती वर्णे, संगीता वाघमारे, प्रशासन अधिकारी ग्यानचंद भाट, सुचेता कुलकर्णी, कार्यालय अधीक्षक महादेव बोरे, क्रीडा पर्यवेक्षक गोरक्ष तिकोने आणि रंगराव कारंडे यांचा समावेश आहे. तसेच क्रीडा शिक्षक मंगल जाधव, स्टाफ नर्स उज्ज्वला जाधव, विद्युत पर्यवेक्षक अनिल नायर, फार्मासिस्ट शशिकांत रिटे, मुख्य लिपिक राजू वेताळ, उपशिक्षक संध्या गायकवाड, मिनाक्षी लोखंडे, केमिस्ट उमा भोगे, भांडारपाल प्रशांत आल्हाट, केशव घाटगे, भगवान शिंगाडे, धनाजी माळवदकर, अंकुश माळी, धनाजी गावडे, हेमंत ढवळे, अनिल मोरे, आबा पाटील, हमीदसाहेब पटेल, गोरक्ष आगळे, शांताराम घारे, हनुमंत घाडगे, दत्तात्रय तापकीर, मोहनदास सर्वगोड, विठ्ठल निगडे, दिलीप गायकवाड, लक्ष्मण तिटकारे आणि शशिकांत शिंदे यांचाही सत्कार करण्यात आला.

याशिवाय संजीवनी पवार, नंदकुमार वाघेरे, बाळासाहेब इंगळे, नितीन काळभोर, एकनाथ वांभिरे, सावकार भिवरे, चंद्रकांत मिरजकर, राजाराम लोंढे, बाबूराव चिंचवडे, बाळू साठे, रविंद्र कुदळे, नारायण केसवड, रमेश दोरगे, रमेश देवकाते, राजू आल्हाट, छाया थोरात, शशीकला पाटील, माणिक कांबळे, मुकुंद कोंढरे, मालन ओव्हाळ, सुधीर जगताप, धनंजय ओव्हाळ, देवराम पवार, विश्वनाथ बोऱ्हाडे, दिलीप हनमंते आणि विजय जगताप यांचाही गौरव करण्यात आला.

# वाईन शॉपबाहेर बाटल्यांचा हल्ला; तरुण जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**खेड :** तालुक्यातील खराबवाडी येथे वाईन शॉपबाहेर झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसान थेट काचेच्या बाटल्यांनी हल्ला करण्यात झाल्याची घटना घडली. या हल्ल्यात एका तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून दक्षिण महाळुंगे पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

दक्षिण महाळुंगे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिपन निरन बरमन (वय २२, रा. खराबवाडी, ता. खेड) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. गुरुवारी (दि. २८) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास खराबवाडी येथील एका वाईन शॉपबाहेर ही घटना घडली. फिर्यादी आणि आरोपी हे वाईन शॉपमध्ये मद्यपान करत असताना टेबल व खुर्ची बाजूला घेण्याच्या किरकोळ कारणावरून त्यांच्यात वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाल्यानंतर आरोपी राहुल अरविंद गावडे (वय २४), सलमान रहीम नदाफ (वय २४) आणि गुफरान कलीम अहमद (वय २५) यांनी फिर्यादीला बाहेर बोलावून घेतल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

वाईन शॉपच्या बाहेर आल्यानंतर आरोपींनी संतापाच्या भरात तेथे पडलेल्या काचेच्या बाटल्या फिर्यादीच्या दिशेने फेकण्यास सुरुवात केली. त्यापैकी एक बाटली रिपन बरमन यांच्या डोक्याला लागल्याने ते गंभीर जखमी झाले. बाटली लागल्याने त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव सुरू झाला आणि परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेदरम्यान आरोपींनी रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या दिशेनेही काचेच्या बाटल्या फेकल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव केली. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आजूबाजूच्या व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केल्याचेही सांगण्यात आले. आरोपींनी मोठमोठ्याने आरडाओरडा करत परिसरात दहशत निर्माण केल्याचा आरोप फिर्यादीने आपल्या तक्रारीत केला आहे. घटनेची माहिती मिळताच दक्षिण महाळुंगे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

याप्रकरणी दक्षिण महाळुंगे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेचा अधिक तपास दक्षिण महाळुंगे पोलिस करीत आहेत.

### अवैध दारू रसायनांचा साठा जप्त

**मावळ :** मावळ तालुक्यातील शिरगाव परिसरात पोलिसांनी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले रसायन आणि साहित्य जप्त करण्यात आले असून या कारवाईत सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणातील महिला आरोपी पोलिसांची चाहूल लागताच फरार झाली असून तिचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २९ मे) रात्री शिरगाव गावाच्या हद्दीत पुणे–मुंबई द्रुतगती मार्गालगत असलेल्या एका खड्ड्याजवळ पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत अवैधरित्या हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल आणि रसायने साठवून ठेवण्यात आल्याचे उघडकीस आले. राधिका कुमार नानावटी (रा. शिरगाव, ता. मावळ) हिने रसायन आणि साहित्य बेकायदेशीररीत्या साठवून ठेवल्याचे आढळून आले. मात्र पोलिसांची कारवाई सुरू होताच आरोपी महिला घटनास्थळावरून पसार झाली. त्यामुळे पोलिसांनी तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून शोधमोहीम हाती घेतली आहे.

# अवैध दारू विक्रीप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** फुगेवाडीतील विषारी दारूकांडानंतर अवैध दारू व्यवसायाविरोधात पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईदरम्यान निगोजे (ता. खेड) येथे हातभट्टीची दारू बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी ही कारवाई करून मोठ्या प्रमाणात हातभट्टीची दारू जप्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. २९) सायंकाळी साडेआठच्या सुमारास निगोजे येथील पिनेकल डायज अँड मोल्ड प्रा. लि. कंपनीसमोरील पत्र्याच्या शेडजवळ छापा टाकण्यात आला. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत नितीन धोंडीबा गायकवाड (वय ५३, रा. जयभीम वस्ती, निगोजे, ता. खेड) याच्या ताब्यातून सुमारे १० हजार रुपये किमतीची हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित व्यक्तीकडे दारू विक्री अथवा साठवणुकीसाठी कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच ही दारू विक्रीच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या बाळगण्यात आल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दारू जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ताडी बनवणाऱ्या मायलेकांना अटक

**लोणी काळभोर :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विषारी दारूकांडामुळे मृतांचा आकडा वाढत असतानाच लोणी काळभोर पोलिसांनी मोठी कारवाई करत मानवी आरोग्यास घातक ठरणारी रासायनिक ताडी तयार करणाऱ्या मायलेकांना रंगेहाथ पकडले आहे. लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात सुरू असलेल्या या अवैध धंद्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे उघड झाले असून पोलिसांनी तयार ताडी, घातक रासायनिक पदार्थ आणि मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त केला आहे. सिद्धांत सुरेश भाले (वय २२) आणि मुक्ताबाई सुरेश भाले (वय ५१, रा. गारुडी वस्ती, शितळादेवी नगर, लोणी काळभोर) अशी अटक करण्यात आलेल्या मायलेकांची नावे आहेत. याप्रकरणी महिला पोलीस हवालदार कविता संपत साळवे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.

### परराज्यातून आरोपीला अटक

**शिरूर :** शहरातील आनंद सोसायटी परिसरात घरकाम करणाऱ्या नोकरानेच मालकाच्या घरातून तब्बल २४ लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि चांदीच्या वस्तू चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शिरूर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने परजिल्ह्यात जाऊन आरोपीला जेरबंद करत चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर येथील आनंद सोसायटीमध्ये राहणारे नितीन मोतीलाल मुथ्था यांच्या घरातून ४ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत सोन्याचे दागिने, चांदीची भांडी तसेच इतर मौल्यवान वस्तू चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी विलास आनंदा खोसडे आणि सारजा विलास खोसडे (रा. भायेगाव, ता. जि. नांदेड) यांनी फिर्यादीच्या परवानगीशिवाय विश्वासघात करून घरातील ऐवज चोरल्याची तक्रार शिरूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

## अधिक ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त धामणी येथील

# खंडोबा मंदिरात हरिद्रागंधउटी सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** अधिक ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त धामणी (ता. आंबेगाव) येथील प्राचीन श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा, म्हाळसाई आणि बाणाई यांच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांचा वासंतिक हरिद्रागंधउटी (हळद) व आंबा-फळफूल सोहळा रविवारी (दि. ३१) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या धार्मिक सोहळ्याला शेकडो भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.



अधिक ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त पारंपरिक हरिद्रागंधउटी सोहळ्यासाठी झेंडू, अष्टर, गुलाब, मोगरा तसेच शुद्ध हळदीचा वापर करण्यात आला. वाढत्या उन्हाळ्यात देवाला थंडावा मिळावा या भावनेतून स्वयंभू सप्तशिवलिंग व मुखवट्यांना हरिद्रागंधाचा लेप लावण्यात आला. तसेच गाभाऱ्यात सुगंधी फुले आणि आंब्याच्या फळांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय आणि सुगंधमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.

अधिक महिन्यातील पौर्णिमेच्या मुहूर्तावर शेकडो भाविकांनी "सदानंदाचा येळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार" च्या जयघोषात खंडेरायाचे दर्शन घेतले. सरत्या चैत्र, वैशाख आणि ज्येष्ठ महिन्यातील वसंत व ग्रीष्म ऋतूमधील ही पाचवी आणि अंतिम वासंतिक हरिद्रागंधउटी होती. स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा, म्हाळसाई आणि बाणाई यांच्या मुखवट्यांवर साकारलेले हरिद्रागंधउटीचे मनोहारी रूप पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सोहळ्याची सुरुवात पहाटे चार वाजता मंदिरातील घंटानादाने झाली. त्यानंतर नऊ जोडप्यांच्या हस्ते वसंतपूजा, दुग्धाभिषेक आणि रुद्राभिषेक संपन्न झाला. खंडेराय, म्हाळसाई, बाणाई आणि जोगेश्वरी यांच्या मूर्तींना वस्त्रालंकार आणि सुगंधी फुलांचे हार अर्पण करण्यात आले. देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, नामदेव भगत, राजेश भगत, राहुल भगत आणि अनिरुद्ध वाळूंज यांनी स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच पंचधातूच्या देखण्या मुखवट्यांवर केशर आणि दवण्याच्या अत्तरमिश्रित हरिद्रागंध हळदीचा लेप दिला. त्यानंतर खंडेरायाला अनारशाचा नैवेद्य दाखवण्यात आला आणि शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. हरिद्रागंधाचे लेपन सुरू असताना मंदिर परिसरात पारंपरिक वाद्यांचा गजर सुरू होता. अभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले. वसंत ऋतूच्या उष्णतेची दाहकता कमी करण्यासाठी मंदिराच्या गाभाऱ्यात व सभामंडपात झेंडू, गुलाब आणि अष्टरच्या फुलांची सजावट करण्यात आली होती. ही सजावट मुंबई येथील ज्ञानेश्वर भुमकर आणि चाकण येथील दत्ता विधाटे यांच्या सौजन्याने करण्यात आली. महिला भाविकांनी आकर्षक रांगोळ्या काढून उत्सवी वातावरण निर्माण केले होते. स्वयंभू सप्तशिवलिंगाला हरिद्रागंधाचे लेपन केल्यानंतर उपस्थित भाविकांच्या कपाळी भंडारा लावण्यात आला. त्यानंतर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले.

## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर पाच महिन्यांनंतर खुले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचे दरवाजे जवळपास पाच महिन्यांनंतर पुन्हा भाविकांसाठी खुले होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांमुळे ९ जानेवारीपासून मंदिरातील दर्शन व्यवस्था बंद करण्यात आली होती. आता येत्या १५ जूनपासून सकाळी ७ ते ११ या वेळेत भाविकांना भगवान भीमाशंकराचे दर्शन घेता येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

मंदिर परिसरात नवीन सभामंडप, पायाभूत सुविधा तसेच भाविकांसाठी अधिक सुरक्षित आणि सुसज्ज व्यवस्था उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सुरुवातीला या विकासकामांसाठी सुमारे एक वर्षाचा कालावधी लागण्याचा अंदाज होता. मात्र भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने रात्रंदिवस काम करून बहुतांश कामे अंतिम टप्प्यात आणली आहेत.

प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले की, सध्या मंदिर परिसरातील बांधकाम साहित्य हटविणे, स्वच्छता, दर्शन व्यवस्था आणि गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक तयारी सुरू आहे. ही सर्व कामे १५ जूनपूर्वी पूर्ण केली जाणार आहेत.

विकासकामांमुळे मंदिर परिसराचे रूपडे बदलत असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

दररोज केवळ एक हजार भाविकांना प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे ऑनलाइन नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. ५ जूनपासून नोंदणी प्रक्रिया सुरू होणार असून नोंदणी केलेल्या भाविकांनी दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक राहणार आहे. १५ ते ३० जून या कालावधीत सकाळी ७ ते ११ या वेळेत दर्शनाची सुविधा उपलब्ध असणार आहे.

## मीनेतील पात्रात मासेमारीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मीना नदी पात्रातील डोहांमध्ये सध्या मासेमारीला वेग आला असून भिल्ल-ठाकर व कातकरी समाजातील अनेक कुटुंबांना त्यातून रोजगार उपलब्ध होत आहे. उन्हाळ्यामुळे नदीचे पात्र बहुतांश ठिकाणी कोरडे पडले असले तरी खोल डोहांमध्ये साठलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर मासे उपलब्ध होत असल्याने मच्छीमारांची लगबग वाढली आहे.



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे आदी गावांमधून वाहणाऱ्या मीना नदीचे पात्र सध्या कोरडे पडले आहे. मात्र नदीपात्रातील खोल डोहांमध्ये अजूनही पाणी शिल्लक असून त्याठिकाणी विविध प्रकारचे मासे आढळून येत आहेत. विशेषतः चिलापी माशांचे प्रमाण अधिक असल्याने मासेमारी व्यवसायाला चालना मिळाली आहे.

या माशांना बाजारपेठेत चांगली मागणी असल्यामुळे शेजारच्या जुन्नर व शिरूर तालुक्यांतील भिल्ल-ठाकर समाजातील मच्छीमार कुटुंबेही या भागात दाखल झाली आहेत. पहाटेपासूनच जाळी, दोऱ्या व पारंपरिक साधनांच्या साहाय्याने मासेमारी सुरू होत असून दिवसभर पकडलेले मासे परिसरातील गावांमध्ये विक्रीसाठी नेले जात आहेत.

चिलापी मासे तुलनेने कमी दरात उपलब्ध होत असल्याने ग्राहकांकडून त्यांना मोठी पसंती मिळत आहे. ताजे मासे थेट गावांमध्ये मिळत असल्याने नागरिकांकडूनही मोठ्या प्रमाणावर खरेदी होत आहे. परिणामी मच्छीमारांना चांगला आर्थिक आधार मिळत असून उन्हाळ्यातील रोजगाराची समस्या काही प्रमाणात कमी झाली आहे.

स्थानिकांच्या मते, मीना नदी पात्रातील डोह हे अनेक आदिवासी मच्छीमार कुटुंबांसाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरत आहेत. पावसाळा सुरू होईपर्यंत या डोहांमधील मासेमारी सुरू राहण्याची शक्यता असून त्यामुळे भिल्ल-ठाकर व कातकरी समाजातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सध्या या व्यवसायावर अवलंबून आहे.

## मेंढपाळांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर

### मीना नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाची तीव्रता वाढल्याने आणि मीना नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडल्याने मेंढपाळांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नदीपात्रातील डोह आटत चालल्याने शेळ्या-मेंढ्या व इतर जनावरांसाठी पाणी उपलब्ध करणे कठीण झाले असून मेंढपाळांना दिवसभर पाण्याच्या शोधात भटकंती करावी लागत आहे.



तालुक्याच्या पूर्व भागातील रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे आदी गावांमध्ये स्थानिक मेंढपाळांसह धनगर समाजातील मोठ्या संख्येने कुटुंबे वास्तव्यास आहेत. दरवर्षी चाऱ्याच्या शोधात धनगर समाजातील मेंढपाळ आपल्या कळपांसह या परिसरात मुक्काम करतात. मात्र यंदा चाऱ्यासोबतच पाण्याचीही तीव्र टंचाई निर्माण झाल्याने त्यांच्यासमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे.

मीना नदीचे पात्र सध्या पूर्णपणे कोरडे पडले असून नदीकिनारी असलेल्या काही खोल खड्ड्यांमध्येच थोडेफार पाणी शिल्लक आहे. त्यामुळे मेंढपाळ शेळ्या-मेंढ्यांना या डोहांच्या परिसरात चारताना दिसत आहेत. दुपारच्या वेळी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे ही मोठी कसरत ठरत आहे. अनेकदा दूरवरून पाणी आणावे लागत असल्याने मेंढपाळांचा वेळ आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होत आहेत.

पाण्याच्या टंचाईबरोबरच परिसरात हिरव्या चाऱ्याचाही तुटवडा जाणवत आहे. शेतीमधील बहुतांश पिकांची काढणी पूर्ण झाल्याने मोकळ्या कुरणांमध्ये चारा उपलब्ध नाही. परिणामी स्थानिक तसेच स्थलांतरित मेंढपाळ शेळ्या-मेंढ्यांसाठी पिंपळ, कडूनिंब, बाभूळ यांसारख्या झाडांच्या फांद्या तोडून चाऱ्याची व्यवस्था करत आहेत. मात्र हा पर्याय तात्पुरता असून जनावरांच्या पोषणासाठी पुरेसा नसल्याचे मेंढपाळ सांगत आहेत.

उन्हाळ्याच्या अखेरीस नदीपात्रातील उर्वरित पाणीसाठाही संपण्याची शक्यता असल्याने मेंढपाळांची चिंता वाढली आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची व्यवस्था करणे हे मोठे आव्हान ठरणार असल्याचे स्थानिकांचे मत आहे.

मीना नदी कोरडी पडल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यातच हिरव्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाल्याने मेंढपाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. झाडांच्या फांद्यांवर जनावरांचा उदरनिर्वाह सुरू असला तरी दीर्घकाळ हा पर्याय उपयोगी ठरणार नसल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## घरफोडीचा गुन्हा उघड; आरोपीला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** घोडेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करण्यात पोलिसांना यश आले असून अत्यंत शिताफीने रचलेल्या सापळ्यात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ९२ हजार ८३७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून घोडेगाव पोलिसांच्या तपासाचे कौतुक केले जात आहे.

घोडेगाव परिसरातील हरीश्चंद्र मंदिराजवळ राहणारे मंजित गुप्ता यांच्या बंद घरात २६ मे रोजी घरफोडीची घटना घडली होती. अज्ञात चोरट्याने घराचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला आणि घरातील लाकडी कपाट उचकटून लॉकरमधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. या घटनेत एकूण ९२ हजार ८३७ रुपयांचा ऐवज चोरीस गेला होता. घटनेची माहिती मिळाल्यानंतर घोडेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

घरफोडीच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हलविली. पोलीस उपनिरीक्षक महेश पवार, संतोष मुळूक, पोलीस हवालदार विठ्ठल वाघ, जालिंदर राहणे, नामदेव ढेंगळे, आशुतोष पानसरे तसेच होमगार्ड स्वप्निल कानडे यांच्या विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. तपास पथकाने घटनास्थळाची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. याशिवाय तांत्रिक विश्लेषण आणि माहितीदारांच्या माध्यमातून संशयिताचा शोध सुरू करण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी राज नारायण तोत्रे (वय २५, रा. काळे कॉम्प्लेक्स, घोडेगाव, ता. आंबेगाव) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी पुराव्यांच्या आधारे कसून चौकशी केल्यानंतर त्याने घरफोडीची कबुली दिली.

कबुलीजबाबानंतर पोलिसांनी आरोपीकडून चोरीतील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ९२ हजार ८३७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. या आरोपीचा परिसरातील इतर घरफोडीच्या घटनांशी काही संबंध आहे का, याचाही तपास केला जात आहे. या कारवाईमुळे परिसरात घडलेल्या घरफोडीच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती काही प्रमाणात कमी झाली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विठ्ठल वाघ करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अल्पावधीत गुन्ह्याची उकल करून मुद्देमाल हस्तगत केल्याबद्दल तपास पथकाचे कौतुक होत आहे.

## शेतकऱ्यांसाठी शेततळी ठरत आहेत वरदान...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असताना शेततळी मात्र शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. शेततळ्यांमध्ये साठवून ठेवलेल्या पाण्याच्या आधारावर शेतकरी आपल्या पिकांना पाणी देत असून अनेक ठिकाणी शेती पिके वाचविण्यात यश मिळत आहे.

पूर्व भागातील रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे तसेच परिसरातील अनेक गावांमध्ये काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून शेततळी उभारली होती. विहिरी, बोअरवेल आणि पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा साठा या शेततळ्यांमध्ये करण्यात आला होता. त्यावेळी केलेली ही गुंतवणूक आजच्या कठीण परिस्थितीत अत्यंत उपयुक्त ठरत आहे.यंदा उन्हाळ्याची तीव्रता अधिक असल्याने पाण्याचे स्रोत अपेक्षेपेक्षा लवकर आटले आहेत. परिसरातील प्रमुख जलस्रोत असलेल्या मीना नदीचे पात्रही पूर्णपणे कोरडे पडले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी पाणी उपलब्ध करणे मोठे आव्हान बनले आहे. अनेक ठिकाणी विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी घटल्याने शेतकऱ्यांना पिके टिकविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. शेततळ्यांमध्ये साठवून ठेवलेले पाणी शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले आहे. चारा पिके, भाजीपाला, फळबागा तसेच इतर नगदी पिकांना या पाण्याचा मोठा लाभ होत आहे. हाताशी उपलब्ध असलेल्या पाण्यामुळे अनेक शेतकरी आपल्या पिकांचे संरक्षण करण्यात यशस्वी ठरत आहेत.

## सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी मेळावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळावे, उत्पादन खर्चात बचत करताना जमिनीचे आरोग्य जपावे आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा स्वीकार करावा, या उद्देशाने तिन्हेवाडी येथे शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आणि कृषी तंत्रज्ञान नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्याला शेतकरी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या फार्मर कप २०२६ स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर तिन्हेवाडी येथील कृषी कन्या महिला विकास गटाने स्पर्धेत सहभागी होण्याची तयारी सुरू केली आहे. त्याच अनुषंगाने शेतकऱ्यांना आधुनिक आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींची माहिती देण्यासाठी हा विशेष मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात कृषी तज्ज्ञांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व, रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, सेंद्रिय बियाणे, जैविक खतांचा वापर, बीजप्रक्रिया तसेच नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले.

कृषी कन्या महिला विकास गटाच्या सदस्यांनी सेंद्रिय शेतीविषयी जनजागृती करण्यासाठी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून रासायनिक शेती आणि सेंद्रिय शेतीमधील फरक प्रभावीपणे मांडण्यात आला. तसेच सेंद्रिय खत आणि बियाणे तयार करण्याची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. महिला बचत गटांनी सेंद्रिय बियाणे आणि खत निर्मितीची तयारी सुरू केली असून इतर शेतकऱ्यांनाही सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहित केले जात आहे. या उपक्रमाचे जिल्हा कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी विशेष कौतुक केले. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी पुढाकार घेऊन सेंद्रिय शेतीचा प्रचार करणे ही सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी खरेदी-विक्री संघाचे लेखाधिकारी भास्कर जगदाळे, उद्योजक राजेंद्र पाचारणे, सरपंच प्रतीक्षा पाचारणे, उपसरपंच कविता आरुडे, तिन्हेवाडी सोसायटीच्या अध्यक्षा तथा माजी सरपंच कविता पाचारणे, माजी सरपंच अलका पाचारणे, माजी उपसरपंच रंगनाथ आरुडे, पी. टी. आरुडे, विठ्ठल वरकड, शिवाजी आरुडे, मारुती करमारे, ग्रामपंचायत सदस्या प्रियांका पाचारणे, ज्योती सांडभोर, सीमा पठारे, कविता सांडभोर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कृषी कन्या महिला विकास गटाच्या अध्यक्षा मनिषा आरुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राबविलेल्या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. हा मेळावा सेंद्रिय शेतीविषयी जागरूकता निर्माण करणारा ठरला.

## चाकण बाजारात उलाढाल सुमारे ४ कोटी ६० लाख रुपये

# टोमॅटो, कारली, गवार, गाजर व मिरचीची भरघोस आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी कांद्याच्या आवकेत वाढ झाली असून भाव स्थिर राहिले. त्याचबरोबर टोमॅटो, कारली, गवार, गाजर, चक्री भोपळा आणि हिरव्या मिरचीची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने बाजारपेठ गजबजून गेली. फळभाज्या आणि पालेभाज्यांच्या दरात तेजी कायम राहिली असून



बाजारातील उलाढाल सुमारे ४ कोटी ६० लाख रुपयांपर्यंत पोहोचली.

कांद्याची एकूण १ हजार २५० क्विंटल आवक झाली. कांद्याला प्रतिक्विंटल कमाल १ हजार ६०० रुपये, मध्यम १ हजार २०० रुपये आणि किमान ७०० रुपये भाव मिळाला. बटाट्याची १ हजार ४०० क्विंटल आवक झाली असून त्याला प्रतिक्विंटल ८०० ते १ हजार ५०० रुपये दर मिळाला. लसणाची ५० क्विंटल आवक झाली असून त्याला प्रतिक्विंटल १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची ३१० क्विंटल आवक झाली असून तिला ४ हजार ते ५ हजार रुपये दर मिळाला. फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटोची ३०९ क्विंटल आवक झाली असून त्याला प्रतिदहा किलोस २ हजार ते २ हजार ६०० रुपये भाव मिळाला. कोबीची १६० क्विंटल आवक होऊन ८०० ते १ हजार २०० रुपये दर मिळाला. फ्लॉवरची १७० क्विंटल आवक झाली असून त्याला १ हजार ते १ हजार ५०० रुपये भाव मिळाला. वांग्याची ७६ क्विंटल आवक होऊन २ हजार ते ३ हजार रुपये, भेंडीला २ हजार ५०० ते ३ हजार ५०० रुपये, दोडक्याला ४ हजार ते ६ हजार रुपये आणि कारलीला ३ हजार ते ४ हजार रुपये दर मिळाला.

दुधी भोपळ्याची ४८ क्विंटल आवक झाली असून त्याला १ हजार ते २ हजार रुपये भाव मिळाला. काकडीला २ हजार ते ३ हजार रुपये, फरसबीला ७ हजार ते ९ हजार रुपये, वालवडला ५ हजार ते ८ हजार रुपये, ढोबळी मिरचीला ३ हजार ते ५ हजार रुपये आणि चवळीला २ हजार ते ३ हजार रुपये दर मिळाला. वाटाण्याला ५ हजार ते ६ हजार ५०० रुपये, शेवग्याला २ हजार ते ३ हजार रुपये, गाजराला १ हजार ते २ हजार रुपये, गवारला २ हजार ५०० ते ४ हजार ५०० रुपये तर आल्याला ४ हजार ५०० ते ५ हजार ५०० रुपये भाव मिळाला. पालेभाज्यांच्या विभागातही चांगली उलाढाल झाली. मेथीच्या १२ हजार १७० जुड्या बाजारात दाखल झाल्या.

## गावठी दारूसाठीचे रसायन जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** बहुळ येथे गावठी दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले सुमारे ८०० लिटर रसायन जप्त करण्यात आले असून या प्रकरणी एका महिलेविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २९ मे) सायंकाळी सुमारे ५.४० वाजण्याच्या सुमारास बहुळ गावातील पठारे वस्ती परिसरात छापा टाकण्यात आला. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे उग्र वासाचे रसायन मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले.

छाप्यादरम्यान पोलिसांना तीन प्लास्टिकच्या ड्रममध्ये सुमारे ८०० लिटर रसायन आढळले. हे रसायन गावठी दारू तयार करण्यासाठी वापरले जात असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या रसायनाची अंदाजे किंमत ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान पंचांच्या उपस्थितीत संबंधित रसायन आणि प्लास्टिकचे ड्रम जागीच नष्ट करण्यात आले. यानंतर पोलिसांनी ड्रमच्या मालकीची चौकशी केली असता ते एका महिलेचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार संबंधित महिलेविरुद्ध चाकण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (क) व ६५ (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## सारांश वृत्त

### प्रगतीसाठी संस्कृतीचे जतन आवश्यक

**इम्फाळ :** समाजाला प्रगती आणि विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे, असे मत मणिपूरचे मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंह यांनी रविवारी व्यक्त केले. लेनिंगथू सनमाही मंदिर संकुलाच्या मंदिर मंडळाचे अध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यानंतर सिंह यांनी हे वक्तव्य केले. "समाजाला प्रगती आणि विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे," असे ते म्हणाले.

### मणिपूरमध्ये दोन कोब्रा बटालियन तैनात

**नवी दिल्ली** : केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या 'कोब्रा' या जंगलयुद्ध युनिटच्या दोन बटालियनना मणिपूरमध्ये तैनात करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहेत. मे २०२३ पासून मैतेई आणि कुकी-झो गटांमधील वांशिक हिंसाचारात २६० हून अधिक लोक मारले गेले आहेत आणि हजारो बेघर झाले आहेत, त्यामुळे राज्य प्रशासन आणि केंद्र सरकार मणिपूरमध्ये दीर्घकालीन शांतता प्रस्थापित करण्यासाठी काम करत आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, गृह मंत्रालयाने (एमएचए) मणिपूरमध्ये दोन कोब्रा बटालियन तैनात करण्याच्या केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) प्रस्तावाला मान्यता दिली आहे.



### निकोटीनकडे लहान मुले आकर्षित

**नवी दिल्ली** : प्रौढांपेक्षा मुले नवीन तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांकडे आकर्षित होण्याची शक्यता नऊ पट जास्त आहे, ज्यामुळे ते उद्योग विपणन धोरणांचे प्राथमिक लक्ष्य बनतात, असा इशारा आरोग्य तज्ज्ञांनी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त दिला. तज्ज्ञांनी सांगितले की तंबाखू आणि निकोटीन उद्योग आपली उत्पादने तरुणांना आकर्षित करण्यासाठी फ्लेवर्स, स्लीक डिझाइन्स, डिजिटल प्रमोशन आणि इतर युक्ती वापरत आहे, ज्यामुळे नवीन पिढी निकोटीनच्या व्यसनाधीन होण्याची चिंता वाढली आहे.

## जनरल अनिल चौहान यांच्याकडून सूत्रे घेतली हाती

# जनरल एन. एस. राजा सुब्रमणी नवे सीडीएस

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारताचे नवे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) म्हणून जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी रविवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. त्यांनी जनरल अनिल चौहान यांच्याकडून देशाच्या सर्वोच्च लष्करी पदाची सूत्रे हाती घेतली. भारतीय सैन्याच्या एकात्मिक संरचनेला बळकटी देणे, लष्करी आधुनिकीकरण आणि थिएटर कमांडसारख्या महत्त्वाच्या सुधारणांना गती देणे ही त्यांच्यासमोरील प्रमुख आव्हाने असणार आहेत.

पदभार स्वीकारल्यानंतर जनरल सुब्रमणी यांना साऊथ ब्लॉक परिसरात त्रिसेना दलाकडून औपचारिक मानवंदना देण्यात आली. यावेळी त्यांनी भारतीय संरक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि भविष्यातील युद्धतंत्रासाठी सज्ज करण्याचा निर्धार व्यक्त केला. लष्करी आधुनिकीकरणासाठी नवकल्पना, समन्वय आणि विविध क्षेत्रांमधील सहकार्य वाढविण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी आपल्या पहिल्याच संबोधनात स्पष्ट केले.

केंद्र सरकारने ९ मे २०२६ रोजी जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची सीडीएसपदी नियुक्ती जाहीर केली होती. सीडीएस या जबाबदारीसोबतच ते संरक्षण मंत्रालयाच्या मिलिटरी अफेअर्स विभागाचे सचिव म्हणूनही कार्य पाहणार आहेत. जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली.

जनरल सुब्रमणी हे भारतीय लष्करातील अत्यंत अनुभवी आणि सन्मानित अधिकारी मानले जातात. त्यांनी यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून काम केले होते. तसेच ते भारतीय सैन्याचे उपसेनाप्रमुख (व्हाइस चीफ ऑफ आर्मी स्टाफ) आणि सेंट्रल कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणूनही कार्यरत होते.

पश्चिम आणि उत्तर सीमांवरील महत्त्वाच्या लष्करी तुकड्यांचे नेतृत्व करण्याचा त्यांना दीर्घ अनुभव आहे. त्यांच्या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण भारतीय सशस्त्र दलांमध्ये 'थिएटर कमांड' संकल्पना राबविण्याची प्रक्रिया सध्या निर्णायक टप्प्यात आहे. या सुधारणेमुळे लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्या कार्यप्रणालीत अधिक समन्वय निर्माण होऊन संयुक्त लढाऊ क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. जनरल सुब्रमणी यांच्या नेतृत्वाखाली या प्रक्रियेला वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, निवृत्त होताना जनरल अनिल चौहान यांनी आपला तीन वर्षे आठ महिन्यांचा कार्यकाळ 'अत्यंत समाधानकारक' असल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यकाळात त्रिसेना एकात्मिकरण, संयुक्त नियोजन आणि संरक्षण सुधारणा यांना विशेष प्राधान्य देण्यात आले होते. संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता, स्वदेशी शस्त्रनिर्मिती, आधुनिक युद्धतंत्रज्ञानाचा अवलंब आणि त्रिसेना समन्वय या चार प्रमुख क्षेत्रांमध्ये जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

## एलओसी ओलांडून पीओकेमध्ये जाण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून पाकिस्तानव्याप्त काश्मीर (पीओके) मध्ये जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना भारतीय लष्कराने ताब्यात घेतले आहे. सुरक्षा दलांनी शनिवारी रात्री ही कारवाई केली. अटक करण्यात आलेले तिघेही बारामुल्ला जिल्ह्यातील सोपोर येथील रहिवासी असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

लष्कराच्या माहितीनुसार, हे तिघे हठलंगा-नंबला मार्गाने एलओसी पार करण्याचा प्रयत्न करत होते. संशयास्पद हालचाली आढळल्यानंतर सुरक्षा दलांनी त्यांना अडवून ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत अटक झालेल्यांपैकी एक जण माजी टेरिटोरियल आर्मी जवान असल्याचे समोर आले आहे.

याच भागात घडलेल्या आणखी एका घटनेत पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील एका व्यक्तीलाही भारतीय सैन्याने ताब्यात घेतले आहे. झीशान मीर असे त्याचे नाव असून तो मुजफ्फराबादचा रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. सिलिकोट परिसरातून एलओसी ओलांडून तो काश्मीरमध्ये आला होता. चौकशीत त्याने उरीमधील टिलेली गावात राहणाऱ्या आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी सीमा ओलांडल्याचा दावा केला आहे. सुरक्षा यंत्रणा झीशान मीर आणि संबंधित महिलेची चौकशी करत आहेत. उरी सेक्टर हा एलओसीलगतचा अत्यंत संवेदनशील भाग मानला जातो. यापूर्वीही या परिसरातून घुसखोरीचे आणि सीमा ओलांडण्याचे अनेक प्रयत्न उधळण्यात आले आहेत. काश्मीरमधील सुरक्षा परिस्थिती लक्षात घेता लष्कर आणि सुरक्षा यंत्रणांनी या भागात गस्त आणि देखरेख अधिक कडक केली आहे.

सुरक्षा अधिकाऱ्यांच्या मते, तिघांनी सीमा ओलांडण्यामागील नेमका उद्देश काय होता, त्यांचे कोणत्याही दहशतवादी संघटनांशी संबंध आहेत का, तसेच त्यांना कोणाकडून मदत मिळाली का याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात केंद्रीय आणि स्थानिक गुप्तचर यंत्रणाही चौकशीत सहभागी झाल्या आहेत.

## मुसळधार पावसामुळे केदारनाथ यात्रा स्थगित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**देहराडून :** उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आल्यानंतर प्रशासनाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. भारतीय हवामान विभागाने रुद्रप्रयागसह पर्वतीय भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून यात्रेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रशासनाने सोनप्रयाग, गौरीकुंड आणि मार्गावरील विविध ठिकाणी यात्रेकरूंना थांबवले असून हवामान सामान्य होईपर्यंत पुढे जाण्यास परवानगी दिली जाणार नाही. सर्व यात्रेकरूंना सुरक्षित ठिकाणीच थांबण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्तराखंडमधील डोंगराळ भागात गेल्या काही दिवसांपासून पावसाची तीव्रता वाढली आहे. हवामान विभागाने वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि भूस्खलनाचा धोका व्यक्त केला आहे. त्यामुळे चारधाम यात्रेवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यापूर्वीही केदारनाथ मार्गावरील मुनकटिया परिसरात भूस्खलन झाल्याने हजारो यात्रेकरू अडकले होते. त्यावेळी एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या पथकांनी मोठे बचावकार्य राबवून १० हजारांहून अधिक भाविकांना सुरक्षितस्थळी हलवले होते. प्रशासनाने यात्रेकरूंना हवामानाचा अंदाज तपासूनच प्रवास करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

केदारनाथ धामचे कपाट यंदा एप्रिलमध्ये उघडण्यात आले असून लाखो भाविक दर्शनासाठी उत्तराखंडमध्ये दाखल होत आहेत. मात्र पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हिमालयीन भागात भूस्खलन आणि रस्ते बंद होण्याचा धोका वाढत असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

## संस्थागत गुंतवणूकदारांनी ३३ हजार कोटी काढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) भारतीय शेअर बाजारातून मे महिन्यात तब्बल ३२,९६३ कोटी रुपये काढून घेतले आहेत. रुपयाची सातत्याने होत असलेली घसरण, कंपन्यांच्या नफावाढीतील मंदी आणि इतर देशांतील आकर्षक गुंतवणूक संधी यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातील गुंतवणूक कमी केल्याचे समोर आले आहे.

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या आकडेवारीनुसार, २०२६ या वर्षात आतापर्यंत एफपीआयंकडून भारतीय इक्विटी बाजारातून सुमारे २.२५ लाख कोटी रुपयांची माघार घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे, हा आकडा संपूर्ण २०२५ मधील १.६६ लाख कोटी रुपयांच्या निर्गुंतवणुकीपेक्षाही अधिक आहे.

यंदाच्या वर्षात फेब्रुवारी महिना वगळता सर्व महिन्यांत एफपीआय विक्रेते राहिले आहेत. जानेवारीत ३५,९६२ कोटी रुपयांची विक्री झाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये २२,६१५ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. मात्र मार्चमध्ये विक्रीचा उच्चांक नोंदवत १.१७ लाख कोटी रुपये बाहेर काढण्यात आले. त्यानंतर एप्रिलमध्ये ६०,८४७ कोटी रुपये आणि मेमध्ये जवळपास ३३ हजार कोटी रुपयांची निर्गुंतवणूक झाली.

तज्ज्ञांच्या मते, भारतातील कंपन्यांच्या तुलनेने कमी नफावाढीमुळे परकीय गुंतवणूकदारांनी अमेरिकेसह जपान, दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या बाजारांकडे आपला कल वाढवला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तेजीमुळे या देशांच्या बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल आकर्षित होत आहे. रुपयाची घसरणही एफपीआय माघारीचे एक महत्त्वाचे कारण ठरत आहे. २०२६ मध्ये रुपया डॉलरच्या तुलनेत सुमारे ६ टक्क्यांनी कमजोर झाला असून गेल्या वर्षभरात त्यात जवळपास १० टक्क्यांची घसरण झाली आहे. डॉलरमधील परताव्यावर त्याचा थेट परिणाम होत असल्याने परकीय गुंतवणूकदारांचा भारतीय बाजारावरील विश्वास कमी होत असल्याचे विश्लेषकांचे मत आहे. भारत आपल्या गरजेपैकी ८० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करत असल्याने वाढत्या तेलदरांचा परिणाम चालू खात्यावरील तुटीवर आणि रुपयावर होत आहे. त्यामुळेही परकीय गुंतवणूकदार सावध भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे.

## ममता बॅनर्जींकडून अभिषेक बॅनर्जींवरील हल्ल्याचा निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर सोनारपूर येथे झालेल्या कथित हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले असून तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे.

सोनारपूरमध्ये निवडणुकीनंतर हिंसाचारग्रस्त कुटुंबांची भेट घेण्यासाठी गेलेल्या अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जमावाने दगड, अंडी आणि इतर वस्तू फेकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या गोंधळात त्यांच्याशी धक्काबुक्की झाल्याचेही वृत्त आहे. काही व्हिडिओंमध्ये अभिषेक बॅनर्जी हेल्मेट घालून जमावातून मार्ग काढताना दिसत असल्याचे सांगितले जात आहे.

घटनेनंतर ममता बॅनर्जी यांनी भाजपवर थेट निशाणा साधत, "सत्ताधारीच आता मारेकरी झाले आहेत," अशी प्रतिक्रिया दिली. त्यांनी या हल्ल्यासाठी भाजपला जबाबदार धरत आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. तृणमूल काँग्रेसकडून राज्यव्यापी निषेध आंदोलन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अभिषेक बॅनर्जी यांनी हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, घटनास्थळी पुरेशी पोलीस व्यवस्था नव्हती आणि त्यांना लक्ष्य करून हल्ला करण्यात आला.

दरम्यान, पश्चिम बंगाल पोलिसांनी या प्रकरणात चार जणांना अटक केल्याची माहिती समोर आली आहे. हल्ल्याप्रकरणी तपास सुरू असून आणखी काही संशयितांची चौकशी केली जात आहे. भाजपने मात्र हल्ल्यामागील कोणताही संबंध फेटाळून लावला आहे. पक्षाच्या नेत्यांनी या घटनेचा निषेध केला असल्याचे वृत्त आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश

# बाल तस्करीवर पॉक्सोचा चाबूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलांचे व्यावसायिक लैंगिक शोषण (सीएसई) करण्यासाठी मानवी तस्करी करणाऱ्या आरोपींवर केवळ भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा (आयटीपीए) यांच्याअंतर्गतच नव्हे, तर लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पॉक्सो) अंतर्गतही कठोर कारवाई करता येईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने मानवी तस्करी आणि बाल लैंगिक शोषणासंदर्भातील कायदेशीर चौकट स्पष्ट करताना हा आदेश दिला. मानवी तस्करीला आळा घालण्यासाठी आणि व्यावसायिक लैंगिक शोषणाच्या पीडितांचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी करणाऱ्या 'प्रज्वला' या स्वयंसेवी संस्थेच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

न्यायालयाने स्पष्ट केले की, तस्करीच्या प्रकरणांमध्ये पीडित व्यक्तीची संमती हा बचावाचा आधार ठरू शकत नाही. विशेषतः अल्पवयीन मुलांच्या बाबतीत संमतीचा प्रश्नच उद्भवत नाही. तस्करीच्या गुन्ह्यात जबरदस्ती, फसवणूक, धमकी, सत्तेचा गैरवापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या शोषणात्मक पद्धतींचा वापर झाला असल्यास आरोपींना कायद्याच्या कठोर चौकटीत आणणे आवश्यक आहे. खंडपीठाने म्हटले की, "तस्करीचा बळी ठरलेल्या मुलाची संमती कायद्याच्या दृष्टीने पूर्णपणे अप्रासंगिक आहे. मानवी तस्करीच्या गुन्ह्यात संमतीचा अभाव हा आवश्यक घटक नाही. त्यामुळे आरोपींनी पीडितेची संमती असल्याचा दावा केला तरी त्याला कोणतेही कायदेशीर महत्त्व राहणार नाही." प्रौढ व्यक्तींच्या बाबतीतही न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. धमक्या, बळजबरी, अपहरण, फसवणूक, अधिकाराचा गैरवापर किंवा आर्थिक प्रलोभन देऊन शोषण केले गेले असल्यास पीडित व्यक्तीची कथित संमती ग्राह्य धरता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. वेश्याव्यवसायाच्या संदर्भातही न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. एखाद्या व्यक्तीने सुरुवातीला वेश्याव्यवसायाशी संबंधित काम स्वीकारले असले, तरी त्यानंतर तिचे शोषण झाले असेल तर त्या प्रकरणात मानवी तस्करीचा गुन्हा नाकारता येणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. अल्पवयीन मुलांचे व्यावसायिक लैंगिक शोषण झाल्याचे आढळल्यास बीएनएसच्या कलम १४३ आणि १४४ तसेच आयटीपीएच्या तरतुदींसह पॉक्सो कायद्याची अंमलबजावणीही केली जाऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. भारतीय कायद्यानुसार मुलांशी संबंधित कोणतेही लैंगिक शोषण संमतीशिवाय मानले जाते आणि पॉक्सो कायद्यात लैंगिक छळ, गंभीर लैंगिक अत्याचार तसेच बाल लैंगिक अत्याचाराशी संबंधित सामग्री यांसारख्या अनेक गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे.

## व्हीआयपी दर्शनावर मद्रास उच्च न्यायालयाची नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** मंदिरांमधील व्हीआयपी आणि सशुल्क विशेष दर्शन व्यवस्था ही चुकीची व भेदभाव करणारी असल्याचे निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. "देवापुढे सर्वजण समान आहेत. मंत्री आणि आमदारांनी देव आपली वाट पाहत बसला आहे, असा समज करून घेऊ नये," असे न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्टपणे म्हटले.

न्यायमूर्ती जी. आर. स्वामिनाथन आणि न्यायमूर्ती व्ही. लक्ष्मीनारायणन यांच्या खंडपीठासमोर तामिळनाडूतील मंदिरांमधील व्हीआयपी आणि विशेष दर्शन व्यवस्था रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने व्हीआयपी दर्शनाच्या प्रथेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

याचिकेत राज्य सरकारच्या हिंदू धार्मिक आणि धर्मादाय निधी (एचआर अँड सीई) विभागाच्या नियंत्रणाखालील मंदिरांमध्ये सुरू असलेली सशुल्क विशेष दर्शन व व्हीआयपी दर्शन व्यवस्था रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. आर्थिक क्षमतेच्या आधारावर दर्शनासाठी वेगवेगळ्या सुविधा देणे हे समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्या वतीने विशेष दर्शन व्यवस्था बंद केल्यास मंदिरांच्या उत्पन्नावर परिणाम होईल, असा युक्तिवाद करण्यात आला. मात्र न्यायालयाने हा मुद्दा फेटाळत, "देवदर्शनासाठी आर्थिक स्तरावर भेदभाव का असावा?" असा सवाल उपस्थित केला.

न्यायालयाने असेही नमूद केले की चर्च आणि मशिदींमध्ये अशा प्रकारची व्हीआयपी दर्शन व्यवस्था नसते. त्यामुळे हिंदू मंदिरांमध्ये अशा पद्धतीचा अवलंब का केला जातो, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

याचिकेत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला, नवविवाहित जोडपी आणि काही विशेष धार्मिक विधींमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र सुविधा कायम ठेवण्यास हरकत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र पैसे देऊन किंवा राजकीय प्रभावाच्या आधारे मिळणाऱ्या विशेष दर्शनाला विरोध करण्यात आला आहे.

## तृणमूल खासदारावर जीवघेणा हल्ला

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील चंडीतला पोलीस ठाण्यासमोर तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत त्यांच्या डोक्याला दुखापत झाल्याचे सांगण्यात येत असून, त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अटक करण्यात आलेले पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांच्या सुटकेच्या मागणीसाठी टीएमसीकडून निवेदन देण्यासाठी जात असताना हा हल्ला झाला.

## राजधानी दिल्लीत इमारत कोसळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दक्षिण दिल्लीतील साकेत मेट्रो स्थानकाजवळील सैदुलाजाब परिसरात बहुमजली इमारत कोसळल्याची भीषण घटना घडली असून यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

शनिवारी सायंकाळी ही दुर्घटना घडली. वेस्टर्न मार्ग परिसरातील ही इमारत अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), दिल्ली पोलीस, दिल्ली आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि रुग्णवाहिका पथके घटनास्थळी दाखल झाली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ढिगाऱ्यातून आतापर्यंत नऊ जणांना बाहेर काढण्यात आले असून त्यापैकी आठ जणांवर एम्स ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. 'रवि' नावाच्या २६ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, इमारत कोसळण्यापूर्वी मोठा आवाज झाला आणि काही क्षणांत संपूर्ण संरचना जमीनदोस्त झाली. ढिगाऱ्याखालून मदतीसाठी आक्रोश आणि किंकाळ्या ऐकू येत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

इमारतीच्या तळमजल्यावर कोचिंग इन्स्टिट्यूट, कॅफे आणि काही व्यावसायिक आस्थापना होत्या, तर वरच्या मजल्यांवर बांधकामाचे काम सुरू होते, अशी माहिती आहे.

## नव्या प्रदेशाध्यक्षांच्या नियुक्तीची शक्यता

# कर्नाटक भाजपमध्ये संघटनात्मक बदलांची तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बंगळूरु :** कर्नाटकमध्ये काँग्रेसकडून डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वाखाली नव्या सरकारची स्थापना होत असताना भारतीय जनता पक्षानेही राज्यातील संघटनात्मक पुनर्रचनेची तयारी सुरू केली आहे. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडून कर्नाटक भाजपमध्ये मोठे बदल करण्याचा विचार सुरू असून लवकरच नव्या प्रदेशाध्यक्षांची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेस सरकार स्थिरावल्यानंतर भाजपचे लक्ष राज्य संघटना मजबूत करण्यावर केंद्रित होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन बूथस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत पक्षाची नव्याने बांधणी करण्याची रणनीती आखली जात आहे.

कर्नाटक भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासह काही वरिष्ठ नेत्यांची नावे चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे. नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून पक्षाला अधिक आक्रमक विरोधी पक्षाची भूमिका बजावता यावी आणि जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचता यावे, असा पक्षाचा प्रयत्न असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे. भाजपसाठी कर्नाटक हे दक्षिण भारतातील सर्वात महत्त्वाचे राज्य मानले जाते. त्यामुळे राज्यातील राजकीय अस्तित्व अधिक मजबूत करण्यासाठी पक्ष दीर्घकालीन रणनीतीवर भर देत आहे. संघटन विस्तार, कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण आणि विविध समाजघटकांमध्ये पक्षाचा प्रभाव वाढविण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मते, पश्चिम बंगालमध्ये ज्या पद्धतीने भाजपने संघटनात्मक विस्तार, कार्यकर्त्यांचे जाळे आणि लक्ष्यित प्रचारावर भर दिला होता, त्याच धर्तीवर कर्नाटकमध्येही काही प्रमाणात दीर्घकालीन रणनीती राबवली जाऊ शकते. राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्षाची उपस्थिती मजबूत करण्यावर भर असेल.

दरम्यान, कर्नाटकमध्ये डी. के. शिवकुमार यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली असून ३ जून रोजी ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपकडून विरोधी पक्ष म्हणून नव्या राजकीय समीकरणांची आखणी सुरू असल्याचे दिसत आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे मत आहे की, राज्यात पुन्हा सत्तेवर येण्यासाठी केवळ नेतृत्वबदल पुरेसा ठरणार नाही, तर संघटनात्मक पुनर्बांधणी, नव्या नेतृत्वाला संधी आणि जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करण्याची गरज आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत कर्नाटक भाजपमध्ये महत्त्वाचे राजकीय बदल पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.